# जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती

कॅम्प अमरावती ४४४ ६०२

Landline No :- 0721 - 2662025/2662493 | Fax :- 0721- 2662843
Email :- homebranch.collamt@gmail.com | Website :- www.amravati.nic.


---

जा.क्र.कक्ष-२७/गृह विभाग/कोरोना वि.प्रति.उपाय./सुधारित निर्देश/कावि-290 /२०२१, दिनांक:-4 /०३/२०२१

**वाचा :-**

१. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५.
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७.
३. मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सुचना पत्र क्रमांक-DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक-२९/०१/२०२१.
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृहविभाग/कावि-१९६/२०२१, दिनांक-२९/०१/२०२१.
५. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र जा.क्र. अकाअ/म.शा.३/कोव्हिड-१९/ कावि-६५०/२०२१, दिनांक-२१/०२/२०२१.
६. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र जा.क्र. अकाअ/म.शा.३/कोव्हिड-१९/ कावि-६५१ /२०२१, दिनांक-२१/०२/२०२१.
७. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३४२/२०२१, दिनांक-२१/०२/२०२१.
८. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३४३/२०२१, दिनांक-२१/०२/२०२१.
९. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. कक्ष-२७/गृह विभाग/को.वि.प्रति.उपाय/संचारबंदी-निर्देश/आदेश/कावि-१८९/२०२१, दिनांक-२७/०२/२०२१.
१०. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. कक्ष-२७/गृह विभाग/को.वि.प्रति.उपाय/संचारबंदी-निर्देश/आदेश/कावि-१९०/२०२१, दिनांक-२७/०२/२०२१
११. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. कक्ष-२७/अ.का./गृह विभाग/को.प्रति.उपाय/कावि-१९१/२०२१,दि.२७/०२/२०२१
१२. मा. मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सुचना पत्र जा.क्र. DMU/2020/CR.92/Dis.M-1, Dated-24/02/2021.

## आदेश

### ( अमरावती जिल्हयाकरीता सुधारित निर्देश)

ज्या अर्थी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक-१३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा -२००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२० लागु करण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासन यांचेकडील सुचनापत्रात नमुद केल्याप्रमाणे तसेच संदर्भीय पत्र क्र. ०५ व ६ अन्वये, मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र. ९ अन्वये, अमरावती महानगरपालिका तसेच अचलपुर नगर परिषद व अंजनगाव सुर्जी नगर परिषद या क्षेत्राकरीता व संदर्भीय आदेश क्र. १० अन्वये, अमरावती जिल्हयातील प्रतिबंधीत क्षेत्र *(Containment Zone)* वगळता जिल्हयातील इतर क्षेत्राकरीता तसेच संदर्भीय आदेश क्र. ११ अन्वये, प्रतिबंधीत क्षेत्राचे हद्दीला लागुन असणाऱ्या / जवळ असणाऱ्या गावांकरीता म्हणजेच अमरावती महानगरपालिकेच्या सिमेच्या जवळ असणाऱ्या कठोरा बु., रामगांव, नांदगाव पेठ, वलगांव, रेवसा व बोरगांव धर्माळे या गावातील बिजिलॅण्ड, सिटीलॅण्ड, ड्रिमलॅण्ड मार्केटचा परिसर (सर्व तालुका अमरावती), तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी,

अचलपुर तालुक्यातील कांडली, देवमाळी, भातकुली तालुक्यातील भातकुली नगर पंचायत क्षेत्र तसेच अंजनगाव सुर्जी नगर परिषद या क्षेत्राकरीता कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने संचारबंदीचे आदेश व निर्देश पारित करण्यात आलेले आहेत.

तथापि सद्यस्थितीचा विचार करता तसेच संदर्भीय सुचना पत्र क्र. १२ चे अनुषंगाने, या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र. ०९, १०, ११ मध्ये बदल आवश्यक आहे. त्यामुळे संदर्भीय आदेश क्र. ०९, १०, ११ मध्ये बदल करण्यात येत असुन दिनांक-०६/०३/२०२१ चे सकाळी ६.०० वाजता पासुन अमरावती शहर (महानगरपालिका क्षेत्र) व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता सुधारित निर्देश खालीलप्रमाणे पारित करीत आहे.

१. सर्व प्रकारची दुकाने / आस्थापना हया सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० पर्यंत सुरु राहतील.
२. सर्व प्रकारची शासकीय कार्यालये (अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आरोग्य व वैद्यकीय, कोषागार, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस, NIC, अन्न व नागरी पुरवठा, FCI, N.Y.K., महानगरपालिका सेवा वगळुन) हया १५% किंवा १५ व्यक्ती यापैकी जी संख्या जास्त असेल, ती ग्राहय धरुन सुरु राहतील.
३. सर्व आस्थापना यांनी सामाजिक अंतर राखणे (Social Distancing), मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे तसेच इतर प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अत्यावश्यक राहिल. उपरोक्त प्रमाणे सामाजिक अंतर न राखणाऱ्या, मास्क व सॅनिटायझरचा व उपस्थितीबाबतचे निर्देशाचे पालन न करणाऱ्या आस्थापना ०५ दिवस बंद करण्यात येऊन (सिल करण्यात येऊन) रक्कम-८,०००/- रुपये (अक्षरी- आठ हजार रुपये) दंड आकारण्यात येईल. याबाबत स्थानिक प्राधिकरणाकडुन वेळोवेळी दुकानामध्ये असलेली सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासण्यात येतील. तथापि सर्व आस्थापना यांनी प्रशासनाचे सुचनेप्रमाणे कोविड-१९ ची चाचणी करणे बंधनकारक राहील.
४. सर्व आस्थापना यांची त्यांचे आस्थापनेसमोर दर्शनी भागामध्ये "No Mask- No Service", "No Mask - No Entry", " मास्क नाही तर प्रवेश नाही", असे फलक लावावे व त्याचे पालन करावे.
५. ग्राहकांनी दुकानामध्ये खरेदी करण्याकरीता जवळपास असलेल्या बाजारपेठ, अतिपरिचित दुकानदार यांचा वापर करावा. शक्यतो दुरचा प्रवास करुन खरेदी करणे टाळावे.
६. लॉजिंगचा व्यवसाय करणाऱ्या प्रतिष्ठाने यांना त्यांचे लॉजिंग क्षमतेच्या २५% मर्यादेमध्ये फक्त निवासी व्यवस्थेकरीता परवानगी अनुज्ञेय राहिल. प्रतिष्ठानाद्वारे अभ्यांगतांना त्यांचे रुममध्ये जेवणाची व्यवस्था उपलब्ध करुन दयावी तसेच सदर प्रतिष्ठानाद्वारे पुरविण्यात येणारे खादयपदार्थ हे सिलबंद असावेत. सदर निर्देशाचा भंग झाल्यास संबंधित प्रतिष्ठान ०५ दिवसांकरीता सिलबंद करण्यात येऊन रक्कम- १५,०००/- रुपये (अक्षरी- पंधरा हजार रुपये फक्त) दंडाची कारवाई करण्यात येईल. याबाबत स्थानिक प्राधिकरणाकडुन वेळोवेळी प्रतिष्ठानामध्ये असलेली सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासण्यात येतील.
७. सर्व प्रकारची उपहारगृहे/हॉटेल्स् प्रत्यक्ष सुरु न ठेवता फक्त पार्सल सुविधेस परवानगी राहिल. सदर सुविधा हि सकाळी ९.०० ते दुपारी ५.०० वा. पर्यंत अनुज्ञेय राहिल.
८. लग्नसमारंभाकरीता फक्त २० व्यक्तींना (वधु व वरासह) परवानगी अनुज्ञेय राहील. लग्न समारंभ सहभागी होणाऱ्या नागरिकांनी शक्यतो Antigen Test करुन घ्यावी. सदर परवानगी हि फक्त वर किंवा वधु यांचे घर अथवा घराचे परिसरात आयोजित लग्न समारंभाकरीता राहिल. लग्न समारंभामध्ये सामाजिक अंतर *(Social Distancing)* चे पालन करावे तसेच माक्स व सॅनिटायझरचा वापर करावा. लग्न समारंभाचे ठिकाणी सदर बाबीचे पालन न झाल्यास आयोजनकास रक्कम- २०,०००/- रु. (अक्षरी- विस हजार रुपये) दंड आकारण्यात येईल. लग्न समारंभ आयोजनास महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयुक्त, महानगरपालिका, नगर .परिषद / नगर पंचायत क्षेत्राकरीता मुख्याधिकारी व इतर सर्व ग्रामीण क्षेत्राकरीता संबंधित तहसिलदार यांचेकडुन परवानगी घेणे बंधनकारक राहिल.
९. सर्व प्रकारची शैक्षणिक कार्यालये (विद्यापीठ, महाविद्यालये, शाळा) येथील अशैक्षणिक कर्मचारी, संशोधन कर्मचारी, वैज्ञानिक यांना ई-माहिती, उत्तरपत्रिका तपासणे, निकाल घोषीत करणे इत्यादी कामाकरीता परवानगी अनुज्ञेय राहील.

जिल्हा दंडाधिकारी अमरावती

-३-

१०. मालवाहतुक हि नेहमीप्रमाणे सुरु राहील आणि वाहतुकीकरीता कुठल्याही प्रकारचे निर्बंध राहणार नाही.

११. सर्व प्रकारची सार्वजनिक व खाजगी वाहतुक करतांना चार चाकी गाडीमध्ये चालकाव्यतिरिक्त इतर ३ प्रवासी अनुज्ञेय राहतील. तीन चाकी गाडी (उदा. ऑटो) मध्ये चालकाव्यतिरिक्त दोन प्रवासी, दुचाकीवर हेल्मेट व मास्क सह २ प्रवासी यांना परवानगी राहील.

१२. ठोक भाजीमंडई सकाळी २.०० वाजता ते सकाळी ६.०० वाजता या कालावधीत सुरु राहील परंतु सदर मंडईमध्ये किरकोळ विक्रेते यांनाच प्रवेश राहील.

१३. अमरावती जिल्हयातील महानगरपालिका तसेच शहरी व ग्रामीण भागातील सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी वर्ग, कोचिंग क्लासेस हे बंद राहतील.

१४. अमरावती जिल्हयातील महानगरपालिका तसेच शहरी व ग्रामीण भागातील सर्व प्रकारची सिनेमागृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव, मनोरंजन उद्याने, नाटयगृहे, प्रेक्षकगृहे व इतर संबंधित ठिकाणे हि बंद राहतील.

१५. अमरावती जिल्हयातील महानगरपालिका तसेच शहरी व ग्रामीण भागातील सर्व प्रकारची सामाजिक, राजकीय, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व इतर स्नेहसंमेलन बंद राहतील.

१६. या कालावधीमध्ये शासकीय, निमशासकीय तसेच इतर तत्सम परिक्षा यांचे ठिकाण यांना परवानगी अनुज्ञेय राहिल.

१७. अमरावती जिल्हयातील अमरावती महानगरपालिका क्षेत्र तसेच जिल्हयातील इतर शहरी भागामध्ये सर्व प्रकारचे आठवडी बाजार बंद राहतील.

सदर आदेश हे दिनांक- ०६ मार्च २०२१ चे सकाळी ६.०० वाजता पासुन ते पुढील आदेशापर्यंत अमरावती जिल्हयातील महानगरपालिका क्षेत्र तसेच जिल्हयातील इतर शहरी व ग्रामीण भागाकरीता लागु राहतील.

उक्त आदेशान्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रामध्ये या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे, असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही, अशा अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

कोरोना विषाणुचे प्रादुर्भावाचे अनुषंगाने सद्यस्थितीतील परिस्थिती पाहता सदर आदेश निर्गमित करण्यात येत असुन पुढील कालावधीमध्ये निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा आढावा घेण्यात येऊन त्यामध्ये परिस्थितीनुसार बदल करण्यात येईल.

सदरहुं आदेश आज दिनांक- ०५/०३/२०२१ रोजी माझ्या सहि व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाद्वारे Public Address System द्वारे प्रसिध्दी देण्यात यावी.

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी, अमरावती**

**प्रतिलिपी :-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

५. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
**आवश्यकतेनुसार Micro-Contaminated Zone घोषीत करण्याची कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी.**

६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरी ता.

७. उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) ---------------------------------- यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
**आवश्यकतेनुसार Micro-Contaminated Zone घोषीत करण्याची कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी.**

८. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, (सर्व) ----------------------- यांना माहिती व उचित कार्यवाहीस.

९. जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
**सदर आदेशास अमरावती जिल्हयातील स्थानिक वृत्तपत्रामधुन व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.**

१०. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

११. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

१२. महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग कार्यालय, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता

१३. मुख्याधिकारी, नगर परिषद /नगर पंचायत (सर्व) ------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१४. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१५. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीत.

१६. संबंधित सर्व विभाग ---------------------------------------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

**जिल्हादंडाधिकारी, अमरावती**